रामानंद नगर पोलीस स्टेशन,
जळगाव. ता.जि.जळगाव.महाराष्ट्र
दुरध्वनी कमांक ०२५७-२२८२८६४

जा.क्र. २९८६ /२०२५

जळगाव दि. - ११/०८/२०२५

# प्रेस नोट

**विषय :-** रामानंद नगर पोलीसांनी अवैध देहविक्री व्यवसायावर केली धडाकेबाज कारवाई.....

**हकीकत :-** दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांना गोपनिय बातमी मिळाली की, न्यु स्टेट बँक कॉलनी परीसरात अवैध वेश्याव्यवसाय सुरु आहे. त्यावरुन लागलीच पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशनला हजर असलेले पोउपनि सचिन रणशेवरे व गुन्हे शोध पथकासह बातमी ठिकाणी पोहचले असता, एका डमी ग्राहकाकडुन सदर बातमीची खात्री केली. सदर डमी ग्राहकाचा इशारा मिळताच रामानंद नगर पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा घातला.

तेव्हा सदर ठिकाणी ०१ पश्चिम बंगाल येथील राहणारी युवती मिळुन आली तिची पोलीसांनी विचारपुस केली असता, व्यवसाय करवुन घेणारे दिनेश चौधरी व यमुना प्रजापती यांनी जास्त पैसे देण्याचे आमीष दिल्याने त्यांना सदर व्यवसाय करण्यास भाग पाडले आहे अशी माहीती दिल्याने, वेश्याव्यवसाय चालविणारे आरोपी दिनेश संजय चौधरी रा.राधाकृष्ण् नगर जळगाव व युमुना प्रजापती उर्फ भारती दिनेश चौधरी रा. न्यु स्टेट बँक कॉलनी जळगाव यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द रामानंद नगर पोस्टे सीसीटीएनएस गुरनं २८०/२०२५ अन्वये स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम ३,४,५,७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

रामानंद नगर पोलीसांनी ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते व उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली, तर मा. पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. कारवाईत पोउपनि सचिन रणशेवरे, पोहेका सुधाकर अंभोरे, जितेंद्र राजपूत, जितेंद्र राठोड, सुशील चौधरी, पोना मनोज सुरवाडे, योगेश बारी, विनोद सूर्यवंशी, रेवानंद साळुंखे, अतुल चौधरी, गोविंदा पाटील मपोशि/अर्चना घुणावत, चापोह/ प्रमोद पाटील यांनी सहभाग घेतला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांचे आदेशाने पोउपनि/ सचिन रणशेवरे करीत आहेत.

(पोलीस निरीक्षक)
रामानंद नगर पोस्टे जळगाव.